पुढारी



बावनकशी सोन्याचा ५२ वर्षांत गुणवत्तापूर्ण, स्वायत्ततापूर्ण प्रवास

समीर बाळासाहेब वाघ
अध्यक्ष, क. का. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रेरणेने १९७० ला क. का. वाघ शिक्षण संस्थेची स्थापना झाली. केजी ते पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण देणारी संस्था, वर्तमान परिस्थितीत क. का. वाघ शिक्षणसंस्था जिल्ह्यातील अग्रेसर, गुणवत्ता व विद्यार्थी विकास केंद्रीय शिक्षणावर भर देणारी शिक्षण संस्था म्हणून नावारूपास आली आहे. गेल्या ५२ वर्षांच्या कालावधीत संस्थेने अभियांत्रिकी आणि तंत्रशिक्षणाच्या विकासावर लक्ष केंद्रित करून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रात महाराष्ट्रातच नव्हे, तर देशपातळीवरील गुणवत्तापूर्ण संस्था, असा नावलौकिक मिळविलेला आहे.

संस्थेचा विकास अभियांत्रिकी व तंत्रज्ञान क्षेत्रापुरता मर्यादित न राहता पारंपरिक शिक्षणावरोबर फाइन आर्ट्स, परफॉर्मिंग आर्ट्स, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व कृषी विज्ञान क्षेत्रात विविध सहा महाविद्यालये प्रारंभ करून महाराष्ट्रातील सर्वात मोठी कृषी शिक्षण प्रदान करणारी संस्था म्हणून नावारूपास आली आहे. तसेच संस्थेंतर्गत इंग्रजी माध्यमाचे स्टेट बोर्ड व सीबीएसई बोर्ड शाळा कार्यरत आहेत. सध्या संस्थेद्वारे ३० विविध महाविद्यालये, तंत्रनिकेतन, शाळा कार्यान्वित असून, २३ हजार विद्यार्थी व १,९०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संस्थेत कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे देशात व परदेशात ८० हजारांहून अधिक माजी विद्यार्थी विविध क्षेत्रांत आपला ठसा उमटवत आहेत. १९७० ला स्थापन झालेल्या रोपट्याचे आज ज्ञानरूपी वटवृक्षात रूपांतर झालेले आहे.

स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा

त्यासाठी संस्थेचे दिवंगत अध्यक्ष बाळासाहेब देवराम वाघ यांनी स्थापनेपासून विश्वस्त, उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून तब्बल ५१ वर्षे संस्था खंबीरपणे उभी केली. संस्था उभारणीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) ऑटोनॉमस अर्थात स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाला आहे. तसेच राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगळुरू (नॅक) यांच्याकडून 'अ' श्रेणी दर्जा प्राप्त झाला आहे. त्याचप्रमाणे

■ देशात-परदेशात ८० हजारांहून अधिक विद्यार्थी विविध क्षेत्रांत क. का. वाघ शिक्षणसंस्थेचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर

राष्ट्रीय स्तरावरील -ICTE-CII सर्वेक्षणाद्वारे अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनास चार वेळा 'सर्वोत्कृष्ट दर्जा' (Platinum Category) ने सन्मानित करण्यात आले आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आयडिया लॅबसाठी अनुदान मिळवणारे क. का. वाघ हे सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठातील एकमेव अभियांत्रिकी महाविद्यालय होय. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आजमितीस अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सात विभागांना एनबीए मानांकन मिळाले आहे. यामध्ये कॉम्प्युटर, इलेक्ट्रिकल, केमिकल आणि इलेक्ट्रनिक ॲण्ड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रॉनिक, सिव्हिल आणि एमसीए या विभागांचा समावेश आहे.

क. का. वाघ तंत्रनिकेतन, नाशिकच्या सहा विभागांना एनबीए मानंकन प्राप्त झाले आहे. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, इन्फॉमेशन टेक्नॉलॉजी, मेकॅनिकेल इंजिनीअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग, केमिकल इंजिनीअरिंग, सिव्हिल इंजिनीअरिंग, आर्टिफिशियल इन्टिलिजन्स व मशीन लर्निंग अशा विविध शाखांमध्ये डिप्लोमा प्रदान करणारे तंत्रनिकेतन आहे. याशिवाय 'ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी' हा औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारा कोर्सही या तंत्रनिकेतन महाविद्यालयात उपलब्ध आहे.

अभियांत्रिकी व तंत्रशिक्षणात एक आदर्श निर्माण करून संस्थेने कृषी शिक्षणाच्या क्षेत्रात कृषी महाविद्यालयांतर्गत कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी महाविद्यालय, कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, कृषी व्यवसाय व्यवस्थापन व उद्यानविद्या महाविद्यालय अशी सहा महाविद्यालये कार्यरत आहेत. महाराष्ट्रात कृषी शिक्षण देणारी सर्वात मोठी संस्था म्हणून क. का. वाघ शिक्षण संस्था नावारूपास आली आहे.

कलाशिक्षणालाही प्राधान्य

आजपर्यंत संगीत, नाट्य, नृत्य यांसारख्या कलागुणांना वाव देणारे शिक्षण हे केवळ मुंबई-पुणे या मोठ्या शहरांमध्ये उपलब्ध होते. हा विचार संस्थेचे दिवंगत अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांनी मोडीत काढत नाशिक येथे क. का. वाघ कला अकादमी अंतर्गत फाइन आर्ट्स व परफॉर्मिंग आर्ट्स महाविद्यालय स्थापन करत अभिजात भारतीय कला जोपासली आहे. संस्थेचे ठळक वैशिष्टये म्हणजे मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे, गुरुकुल, बँकिंग, व्यायामशाळा, कॅन्टीन, ग्राहक भांडार, पार्किंग, बसव्यवस्था, सुरक्षा विभाग इ. सुविधा महाविद्यालये, तंत्रनिकेतन व शाळा येथे उपलब्ध आहेत. नाशिक शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे, या हेतूने निफाड परिसरातील पंचक्रोशीतल्या गावांना उच्चशिक्षणाची सुविधा पुरविण्यासाठी संस्थेने भाऊसाहेबनगर, काकासाहेबनगर, पिंपळस व चांदोरी येथे वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयांची स्थापना केली असून, यातून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम

संस्थेने सन २०१९-२० हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले. या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम इंद्रधनुष्य, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, पर्यावरणपूरक गणेश कार्यशाळा, स्वच्छता अभियान, मान्यवर वक्त्यांची व्याख्याने, प्रोजेक्ट रॅली, माजी विद्यार्थी महामेळावा, सीईओ मीट २.० आदींसह अनेक उपक्रम राबविण्यात आले. त्याचप्रमाणे सन-२०२३ हे पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करत आहोत. त्याअंतर्गत १२५ गुणवंत माजी विद्यार्थी व संस्थेंतर्गत सेवानिवृत्त झालेले कर्मचारी यांचा जाहीर पुरस्कार समारंभ कवी कालिदास कलामंदिर येथे आयोजित करण्यात आला. आजवर कर्मवीर काकासाहेब वाघ व्याख्यानमालेंतर्गत ७५ पुष्पे नाशिक शहराच्या विविध कलादालनांमध्ये गुंफण्यात आले. त्याचप्रमाणे आदरणीय बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांचे स्मृतिप्रीत्यर्थ आजमितीस आठ पुष्पे गुंफण्यात आली. याप्रसंगी सामाजिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील नावाजलेल्या वक्त्यांनी नाशिककरांना मंत्रमुग्ध केले.

कॅम्पस ड्राइव्हमधून भरघोस पॅकेज

क. का. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेल मार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विविध मल्टिनॅशनल उद्योगसमूहातर्फे कॅम्पस ड्राइव्ह पार पडले. यामध्ये एकूण ५७५ हून अधिक विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली आहे. यात विद्यार्थ्यांना सर्वाधिक २० लाख रुपयांपर्यंतचे पॅकेज तर सरासरी ४.५० लाख रुपयांचे पॅकेजचा समावेश आहे. संस्थेत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाबरोबर विद्यार्थिकेंद्रित विकासावर भर देत रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून वाटचाल करत आहेत.

(शब्दांकन: प्रसाद जगताप,
संपर्क अधिकारी, क. का. वाघ
शिक्षण संस्था, नाशिक)

My Nashik Edition
Dec 28, 2023 Page No. 2
newspaper.pudhari.co.in